महावितरण (TM)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

प्रकाशगड, ५ वा मजला, स्टेशन रोड, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१
दु.क्र.(ऑ.)२६४७४२११, २६४७२१३१ वि.क्र.३५०७ (वै.)२६४७४७५१ फॅक्स : ०२२.२६४७६२३३, २६४७२३१८

---

पी-आर-३/जीवन संजीवनी/ No 16080 दिनांक : 18 MAY 2010

## वाणिज्य परिपत्रक क्र. ११५

**विषय :-** **ग्रामिण नळपाणी पुरवठा योजनांच्या थकीत वीज देयकांच्या अदायगीसाठी लागू केलेल्या "जीवन संजीवनी "योजनेला मुदतवाढ.**

संदर्भ :- १. शासन निर्णय क्र.ग्रा.पा.धो.-११०९/प्र. क्र.०२०/पापु ०७ दि.१५ जून २००९.
२. वाणिज्य परिपत्रक क्र.९६ दि.२० जुलै २००९ .
३. शासन निर्णय क्र. ग्रापाधो ११०९/प्र.क्र.१८५/पापु-०७ दि.२३.३.२०१०.

************

वरील संदर्भातील अ.क्र.१ च्या शासन निर्णयान्वये ग्रामीण नळपाणी पुरवठा योजनांच्या थकीत वीज देयकांच्या अदायगीसाठी "जीवन संजीवनी" योजना लागु करण्यात आलेली होती. सदर योजना वरील संदर्भ क्र. २ च्या परिपत्रकाद्वारे सर्व क्षेत्रिय कार्यालयांना अंमलबजावणी करीता कळविण्यात आलेली होती. सदर योजना ही राज्यातील ग्रामीण भागातील प्रादेशिक स्वतंत्र नळ पाणी पुरवठा योजनांच्या थकीत वीज देयके असणा-या ग्राहक संस्थांना (ग्रामपंचायत / जिल्हा परिषद / महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) लागू होती. सदर योजनेची मुदत ३१ ऑक्टोबर २००९ पर्यंत होती. या योजनेला मिळालेला चांगला प्रतिसाद तसेच विहित कालावधीत ज्या ग्राहक संस्थांना या योजनेमध्ये सहभागी होता आले नाही, अशा ग्राहक संस्थांना या योजनेमध्ये सहभागी होता यावे यासाठी शासनाने संदर्भ क्र. ३ च्या आदेशान्वये "जीवन संजीवनी" योजनेस दि.३१ ऑक्टोबर २०१० पर्यंत मुदत वाढ दिलेली आहे. "जीवन संजीवनी" योजनेच्या इतर अटी व शर्ती वाणिज्य परिपत्रक क्र. ९६ दि. २० जुलै २००९ प्रमाणे कायम असुन त्यामध्ये कुठलाही बदल करण्यात आलेला नाही.

सर्व क्षेत्रिय अधिका-यांना कळविण्यात येते की, जीवन संजीवनी योजनेला दिलेल्या मुदतवाढी बद्दल स्थानिक पातळीवर व्यापक प्रसिद्धी देऊन योजना यशस्वीपणे अंमलात आणावी.

संचालक (संचलन)

**प्रत:**
**प्रेषण यादीनुसार.**

D:\आर बी बी\PWW Sanjivani\Jeeva Sanjivani_Extention.doc